**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004**
**MAHARASHTRA**
PHONE: EPBX - 2609000 FAX:0091-0231-2691533 & 0091-0231-692333
DLL 02312609091,2609135 Website : www.unishivaji.ac.in E-mail :affiliation.t2@unishivaji.ac.in
Website Conduit : (1) Affiliation→Affiliation T2 Circulars(2) Affiliation →Affiliation T2 Information Lists
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४ महाराष्ट्र
दूरध्वनी ईपीबीएक्स- २६०९०००, फॅक्स ००९१०२३१२६९१५३३ व ००९१०२३१६९२३३३
संलग्नता टी २ विभाग थेट दूरध्वनी क्र. ०२३१ २६०९०९१,२६०९१३५

Estd. 1962
"A++"
Accredited by
NAAC(2021)
With CGPA 3.52

संदर्भ क्र. शिवाजी वि/संलग्नता/टी-२/शासन टे./ No 1 5 8 6 4 दि. 29 OCT 2026

## स्मरणपत्र

## अत्यंत महत्वाचे व तातडीचे परिपत्रक

प्रति,
मा.प्राचार्य / संचालक,
विद्यापीठ संलग्नीत सर्व महाविद्यालये/मान्यता प्राप्त शैक्षणिक संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

विषय :- सन २०२६ च्या खरीप हंगामातील Trigger-1 (प्रथम कळ) व Trigger-2 (दुसरी कळ) लागू झालेल्या तालुक्यामध्ये जाहीर करण्यात आलेल्या दुष्काळाच्या अनुषंगाने महाविद्यालय स्तरावर दुष्काळ निवारण कक्ष स्थापन करणेबाबत तसेच स्थापन दुष्काळ निवारण कक्ष समितीची नावे व अहवाल विद्यापीठास सादर करणेबाबत...

संदर्भ :- १. मा.सह सचिव, मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन यांचा शासन निर्णय क्रमांक :- समिती-२०२६/प्र.क्र.८२/मदत-२ दि.२५ सप्टेंबर, २०२६.
२. उच्च शिक्षण, संचालनालय, महाराष्ट्र राज्य, ४१२ ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर, पुणे यांचे संदर्भ क्र.उशिसं/शिष्यवृत्ती/दुष्काळ-फी माफी-२६-२७/ई-३१५४७३६, दि.०७.१०.२०२६ चे पत्र.
३. मा. अवर सचिव, मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन यांचा शासन निर्णय क्रमांक :- समिती-२०२६/प्र.क्र.८२/मदत-२ दि. १४ ऑक्टोंबर, २०२६.
४. विद्यापीठ कार्यालयाकडील संदर्भ क्र. शिवाजी वि/संलग्नता/टी-२/शासन टे./१५६२ दि.२१.१०.२०२६ रोजीचे अत्यंत महत्वाचे व तातडीचे परिपत्रक.

महोदय / महोदया,

उपरोक्त विषय व संदर्भिय पत्रानुसार, सन २०२६ च्या खरीप हंगामातील Trigger-1 (प्रथम कळ) व Trigger-2 (दुसरी कळ) लागू झालेल्या तालुक्यामध्ये जाहीर करण्यात आलेल्या दुष्काळाच्या अनुषंगाने महाविद्यालय स्तरावर दुष्काळ निवारण समिती गठीत करणेबाबत तसेच सदर कामकाजासाठी महाविद्यालय स्तरावर समन्वयक यांची नेमणूक करुन सदर समितीची नावे, मोबाईल नंबर व ई-मेल आय.डी. याची माहिती विद्यापीठास तात्काळ कळविण्यात यावी. तसेच आपल्या महाविद्यालयामध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांपैकी किती विद्यार्थी Trigger-1 (प्रथम कळ) व Trigger-2 (दुसरी कळ) लागू झालेल्या तालुक्यामधील आहेत त्यांच्याबद्दलची सर्व माहिती विद्यापीठास दुष्काळ निवारण समिती कामकाजाच्या अहवालासह (सही व महाविद्यालय शिक्का आवश्यक) सादर करणेबाबत उपरोक्त संदर्भ क्र.४ अन्वये कळविण्यात आलेले होते.

तथापी, अद्यापही काही महाविद्यालयांची माहिती विद्यापीठ कार्यालयास प्राप्त झालेली दिसून येत नाही. त्याअनुषंगाने आपल्या महाविद्यालयाकडील माहिती तात्काळ संलग्नता टी-२ विभागास सादर करावी. ज्या-ज्या महाविद्यालयांची माहिती प्राप्त होणार नाही अशा महाविद्यालयांमधील दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांबाबत होणाऱ्या नुकसानीस महाविद्यालय जबाबदार राहिल.

तसेच वेळोवेळी शासन स्तरावरून अवगत झालेल्या पत्रांच्या अनुषंगाने महाविद्यालय स्तरावर गठीत करण्यात आलेल्या कृती समितीचा तपशील व राबविण्यात येणाऱ्या मदत व उपाययोजनांचा तपशीलात्मक अहवाल दर १५ दिवसांनी न चूकता विद्यापीठ कार्यालयास सादर करावा.

उपरोक्त सर्व बाबींच्या अनुषंगाने दुष्काळग्रस्त भागातील महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांचा नेमक्या कोणत्या गरजा आहेत हे जाणून घेण्यासाठी प्रत्येक महाविद्यालयांमधील दुष्काळ निवारण समिती समन्वयक यांच्यासोबत विद्यापीठ गठित कृती समितीची ऑनलाईन (Online) बैठक घेणे आवश्यक असल्याने तात्काळ महाविद्यालयाची माहिती पाठवून द्यावी ही विनंती.

कळावे.

आपला विश्वासू,

उपकुलसचिव
संलग्नता टी-२ विभाग

सोबत:- वरीलप्रमाणे

D:\NTW & BSP\Shasan T. 2026\Circular 2025.Docx

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004
MAHARASHTRA
PHONE: EPBX - 2609000 FAX:0091-0231-2691533 & 0091-0231-692333
DLL 02312609091,2609135 Website : www.unishivaji.ac.in E-mail :affiliation.t2@unishivaji.ac.in
Website Conduit : (1) Affiliation→Affiliation T2 Circulars(2) Affiliation →Affiliation T2 Information Lists
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४ महाराष्ट्र
दूरध्वनी ईपीबीएक्स- २६०९०००, फॅक्स ००९१०२३१२६९१५३३ व ००९१०२३१६९२३३३
संलग्नता टी २ विभाग थेट दूरध्वनी क्र. ०२३१ २६०९०९१,२६०९१३५

Estd. 1962
"A++"
Accredited by
NAAC(2021)
With CGPA 3.52

संदर्भ क्र. शिवाजी वि/संलग्नता/टी-२/शासन टे./ Nc 1 5 6 2 / दि. 21 OCT 2026

# अत्यंत महत्वाचे व तातडीचे परिपत्रक

प्रति,
मा.प्राचार्य / संचालक,
विद्यापीठ संलग्नीत सर्व महाविद्यालये/मान्यता प्राप्त शैक्षणिक संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

विषय :- सन २०२६ च्या खरीप हंगामातील **Trigger-1** (प्रथम कळ) व **Trigger-2** (दुसरी कळ) लागू झालेल्या तालुक्यामध्ये जाहीर करण्यात आलेल्या दुष्काळाच्या अनुषंगाने महाविद्यालय स्तरावर दुष्काळ निवारण कक्ष स्थापन करणेबाबत तसेच स्थापन दुष्काळ निवारण कक्ष समितीची नावे व अहवाल विद्यापीठास सादर करणेबाबत...

संदर्भ :-
१. मा.सह सचिव, मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन यांचा शासन निर्णय क्रमांक :- समिती-२०२६/प्र.क्र.८२/मदत-२ दि.२५ सप्टेंबर, २०२६.
२. उच्च शिक्षण, संचालनालय, महाराष्ट्र राज्य, ४१२ ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर, पूणे यांचे संदर्भ क्र.उशिसं/शिष्यवृत्ती/दुष्काळ-फी माफी-२६-२७/ई-३१५४७३६, दि.०७.१०.२०२६ चे पत्र.
३. मा. अवर सचिव, मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन यांचा शासन निर्णय क्रमांक :- समिती-२०२६/प्र.क्र.८२/मदत-२ दि. १४ ऑक्टोंबर, २०२६.

महोदय / महोदया,

उपरोक्त विषय व संदर्भिय पत्रानुसार, सन २०२६ च्या खरीप हंगामातील Trigger-1 (प्रथम कळ) व Trigger-2 (दुसरी कळ) लागू झालेल्या तालुक्यामध्ये जाहीर करण्यात आलेल्या दुष्काळाच्या अनुषंगाने महाविद्यालय स्तरावर दुष्काळ निवारण समिती गठीत करण्यात यावी. तसेच सदर कामकाजासाठी महाविद्यालय स्तरावर समन्वयक यांची नेमणूक करणेत यावी. सदर समितीची नावे, मोबाईल नंबर व ई-मेल आय.डी. याची माहिती विद्यापीठास तात्काळ कळविण्यात यावी. तसेच आपल्या महाविद्यालयामध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांपैकी किती विद्यार्थी Trigger-1 (प्रथम कळ) व Trigger-2 (दुसरी कळ) लागू झालेल्या तालुक्यामधील आहेत त्यांच्याबद्दलची सर्व माहिती विद्यापीठास दुष्काळ निवारण समिती कामकाजाच्या अहवालासह (सही व महाविद्यालय शिक्का आवश्यक) सादर करावा.

तसेच वेळोवेळी शासन स्तरावरून अवगत झालेल्या पत्रांच्या अनुषंगाने महाविद्यालय स्तरावर गठीत करण्यात आलेल्या कृती समितीचा तपशील व राबविण्यात येणाऱ्या मदत व उपाययोजनांचा तपशीलात्मक अहवाल दर १५ दिवसांनी न चूकता विद्यापीठ कार्यालयास सादर करावा.

उपरोक्त सर्व बाबींच्या अनुषंगाने दुष्काळग्रस्त भागातील महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांचा नेमक्या कोणत्या गरजा आहेत हे जाणून घेण्यासाठी प्रत्येक महाविद्यालयांमधील दुष्काळ निवारण समिती समन्वयक यांच्यासोबत विद्यापीठ गठित कृती समितीची ऑनलाईन (Online) बैठक घेणे आवश्यक असल्याने सदर बैठकीचा तपशील आपल्याला ई-मेलव्दारे वेळोवेळी कळविण्यात येईल याची नोंद घ्यावी.

कळावे.

आपला विश्वासू,

उपकुलसचिव
संलग्नता टी-२ विभाग

सोबत:- वरीलप्रमाणे

D:\NTW & BSP\Shasan T. 2026\Circular 2025.Docx

सन २०२६ च्या खरीप हंगामातील Trigger-१ (प्रथम कळ) आणि Trigger-२ (दुसरी कळ) लागू झालेल्या ३०५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करुन विविध उपाययोजना व सवलती लागू करणेबाबत.

# महाराष्ट्र शासन

मदत व पुनर्वसन विभाग

शासन निर्णय क्रमांक:- समिती-२०२६/प्र.क्र.८२/मदत-२

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,

मंत्रालय, मुंबई- ४०००३२

दिनांक :- १४ ऑक्टोंबर २०२६

वाचा:- १) शासन निर्णय क्रमांक: संकिर्ण-२०१७/प्र.क्र.१७३/२०१७/म-७, दि.०७ ऑक्टोबर, २०१७

२) शासन निर्णय, क्रमांकः संकिर्ण-२०१७/प्र.क्र.१७३/२०१७/म-७, दि. २८ जून, २०१८

३) शासन पत्र क्रमांकः एससी वाय-२०२१/प्र.क्र.१००/म-७, दि. १८ ऑक्टोबर, २०२१

४) शासन निर्णय क्रमांक: एससीवाय-२०२३/प्र.क्र.३७/म-७, दि. ३१ ऑक्टोबर, २०२३

५) शासन निर्णय क्रमांक: समिती-२०२६/प्र.क्र.८२/मदत-२, दि. २२ सप्टेंबर, २०२६

६) शासन निर्णय क्रमांक: समिती-२०२६/प्र.क्र.८२/मदत-२, दि. २५ सप्टेंबर, २०२६

७) शासन निर्णय क्रमांक: समिती-२०२६/प्र.क्र.८२/मदत-२, दि. २९ सप्टेंबर, २०२६

८) मा. मंत्रिमंडळ उपसमिती दि. २९.०९.२०२६ बैठक इतिवृत्त

९) शासन निर्णय क्रमांक: समिती-२०२६/प्र.क्र.८२/मदत-२, दि. ०४ ऑक्टोंबर, २०२६

प्रस्तावना:

दुष्काळ व्यवस्थापन संहिता २०१६ नुसार राज्यातील दुष्काळी परिस्थितीचे मूल्यांकन करण्याबाबत संदर्भाधीन शासन निर्णय क्रमांक १ व २ अन्वये सविस्तर कार्यपध्दती विहित करण्यात आली आहे. २०२६ च्या खरीप हंगामातील परिस्थितीच्या आधारे Trigger-१ (प्रथम कळ) लागू झालेले २६५ तालुके संदर्भ क्र. ६ अन्वये दुष्काळी तालुके म्हणून घोषित करण्यात आले होते. आत्ता खरीप २०२६ च्या हंगामातील परिस्थितीच्या आधारे राज्यातील ३०५ तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थिती असल्याचे Trigger-१ (प्रथम कळ) व Trigger-२ (दुसरी कळ) यावरून दिसून येते. तसेच राज्यात दि. ५ ऑक्टोंबर २०२६ नंतर पावसाळा संपलेला आहे. त्यामुळे राज्यात आत्ता एकूण अंतिमत: ३०५ दुष्काळी तालुके घोषित करणे व या तालुक्यांमध्ये विविध उपाययोजना व सवलती लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

राज्यातील तालुक्यांमध्ये जून ते आज पर्यंत (दि. ५ ऑक्टोंबर, २०२६ नंतर पावसाळा संपलेला आहे.) या कालावधीतील पर्जन्याची तूट व अन्य घटकांनी प्रभावित झालेल्या तालुक्यातील Trigger-१ (प्रथम कळ) आणि Trigger-२ (दुसरी कळ) बाबत प्राप्त झालेल्या माहिती नुसार अंतिमत: ३०५ तालुके हे दुष्काळी तालुके म्हणून जाहीर करण्यात येत आहेत. सदर अंतिमत: जाहिर झालेल्या ३०५ दुष्काळी तालुक्यांमध्ये पंचनामे करण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी यांनी तात्काळ सुरु करावी. सर्व्हेक्षण केलेल्या क्षेत्रातील पिकांची स्थिती दर्शवणारे छायाचित्र व जीपीएस कोऑडीनेट संकलन करून पिक परिस्थितीचा अहवाल आयुक्त, कृषी यांच्या मार्फत शासनास तात्काळ सादर करण्यात यावा.

२. राज्यातील परिशिष्ट-१ मध्ये नमूद केल्यानुसार जाहीर केलेल्या एकूण अंतिमत: ३०५ तालुक्यांना राज्य शासनाकडून विशेष बाब म्हणून खालील उपाययोजना व सवलती लागू करण्याचा निर्णय घेतला आहे.

१) जमीन महसूलात सूट

२) पिक कर्जाचे पुनर्गठन

३) शेतीशी निगडीत कर्जाच्या वसूलीस स्थगिती

४) कृषी पंपाच्या चालू विजबिलात सूट (७.५ हॉर्सपावर पर्यंत क्षमतेच्या विजपंपाचे वीज बिल अगोदरच माफ करण्यात आले आहे. त्यावरील वीज पंपांना सदर सूट लागू असेल)

५) शालेय/महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परिक्षा शुल्कात माफी

६) रोहयो अंतर्गत कामाच्या निकषात शिथिलता आणून जास्तीत जास्त कामे सुरु करणे

७) आवश्यक तेथे पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी टँकर्सचा वापर

८) टंचाई जाहीर केलेल्या गावात शेतक-यांच्या शेतीच्या पंपाची वीज जोडणी खंडीत न करणे

९) शेतीवर आश्रित शेतकरी/मजूर इत्यादी यांना अन्न धान्याची टंचाई होणार नाही याबाबत व्यवस्था उभी करणे

१०) जनावरांना आवश्यक चारा उपलब्ध होईल याची व्यवस्था करणे

११) जलसंधारणाची कामे सुरु करणे

१२) अगोदरच निर्गमित करण्यात आलेले शासन निर्देशाप्रमाणे पिण्याचे पाणी आणि जनावरांसाठी पाण्याचे नियोजन करणे.

३. सदर अंतिमत: जाहीर केलेल्या ३०५ दुष्काळी तालुक्यांमधील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना शेत पिकांच्या नुकसानीबाबतची मदत विहीत कार्यपध्दतीची पूर्तता करुन स्वतंत्र शासन निर्णयान्वये जाहीर केली जाईल.

४. या आदेशान्वये देण्यात येणा-या विविध सवलतीपोटीचा आर्थिक भार संबंधित प्रशासकीय विभागांनी उचलावा व त्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा. त्यानुसार या प्रकरणी पुढील उचित कार्यवाही करावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६१०१४१२५५५३४३४१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by SUNIL SAHADEV SAMANT
Date: 2026.10.14 12:57:10 +05'30'

(सुनिल स. सामंत)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, मलबार हिल. मुंबई
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा. उपमुख्यमंत्री (गृह) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मा. उपमुख्यमंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५) सर्व मा. लोकसभा सदस्य/राज्यसभा सदस्य (महाराष्ट्रातील)
६) सर्व मा. विधानसभा सदस्य/विधान परिषद सदस्य
७) सर्व मा. मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
८) मा. मुख्य सचिव यांचे सहसचिव, मंत्रालय, मुबई
९) अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१०) अपर मुख्य सचिव (कृषी), कृषी, मंत्रालय, मुंबई
११) अप्पर मुख्य सचिव (महसुल), महसुल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१२) अपर मुख्य सचिव (सहकार), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुबई
१३) अपर मुख्य सचिव (जलसंपदा), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
१४) प्रधान सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
१५) प्रधान सचिव (पाणी पुरवठा व स्वच्छता), पाणी पुरवठा विभाग, जी. टी हॉस्पीटल, मुंबई
१६) प्रधान सचिव (मृदु व जलसंधारण), मृदु व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुबई
१७) प्रधान सचिव (उच्च व तंत्र शिक्षण), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
१८) प्रधान सचिव (ऊर्जा),, ऊर्जा विभाग, मंत्रालय, मुंबई
१९) सर्व विभागीय आयुक्त
२०) सर्व जिल्हाधिकारी
२१) आयुक्त (कृषि), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
२२) महालेखापाल १/२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर

२३) महालेखापाल १/२ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
२४) सर्व जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी
२५) वित्त विभाग (व्यय-९/ अर्थसंकल्प/अर्थोपाय), मंत्रालय, मुंबई.
२६) सर्व सहसचिव/उपसचिव, कृषी विभाग, मंत्रालय, मुंबई
२७) सह सचिव तथा वित्तिय सल्लागार, मदत व पुनर्वसन, नवीन प्रशासन इमारत, मंत्रालय, मा
२८) महसूल व वन विभाग, कार्यासन क्रमांक मदत-१/मदत-३
२९) निवडनस्ती (कार्यासन मदत-२)

शासन निर्णय क्र.समिती-२०२६/प्र.क्र.८२/मदत-२, दिनांक १४.१०.२०२६ सोबतचे

परिशिष्ट-१

खरीप हंगाम २०२६-प्रथम कळ (Trigger-१) व दुसरी कळ (Trigger -२) लागू झालेल्या तालुक्यांची यादी

| महसूल विभाग | अ.क्र. | जिल्हा | प्रथम कळ (Trigger-१) व दुसरी कळ (Trigger -२) लागू झालेले तालुके | तालुक्यांची संख्या |
|---|---|---|---|---|
| कोकण | १ | ठाणे | निरंक | ० |
| | २ | पालघर | जव्हार, मोखाडा, तलासरी | ३ |
| | ३ | रायगड | श्रीवर्धन | १ |
| | ४ | रत्नागिरी | रत्नागिरी, संगमेश्वर, राजापूर, लांजा, मंडणगड, खेड | ६ |
| | ५ | सिंधुदुर्ग | सावंतवाडी, दोडामार्ग, कणकवली, कुडाळ, वैभववाडी, मालवण, देवगड, वेंगुर्ला | ८ |
| नाशिक | ६ | नाशिक | मालेगाव, बागलाण, कळवण, नांदगाव, सुरगणा, इगतपुरी, पेठ, सिन्नर, येवला, देवळा, त्र्यंबकेश्वर, चांदवड व निफाड | १३ |
| | ७ | धुळे | धुळे, साक्री, सिंदखेडा, शिरपूर | ४ |
| | ८ | जळगांव | एरंडोल, पारोळा, धरणगाव, चोपडा, पाचोरा, जामनेर, जळगाव, भडगाव, अमळनेर, रावेर, चाळीसगाव, भुसावळ, बोदवड, मुक्ताईनगर, यावल, | १५ |
| | ९ | नंदुरबार | अक्कलकुवा, शहादा, नंदूरबार, नवापुर, तळोदा, अक्राणी | ६ |
| | १० | अहिल्यानगर | अहिल्यानगर, पारनेर, श्रीगोंदा, कर्जत, जामखेड, शेवगाव, पाथर्डी, नेवासा, राहुरी, संगमनेर, अकोले, कोपरगाव, श्रीरामपुर, रहाता | १४ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| पुणे | ११ | पुणे | भोर, वेल्हे, खेड, शिरूर, बारामती, इंदापूर, दौंड, पुरंदर,आंबेगाव,जुन्नर | १० |
| | १२ | सोलापूर | उ. सोलापूर, द. सोलापूर, बार्शी, अक्कलकोट, मोहोळ, माढा, करमाळा, पंढरपूर, सांगोला, माळशिरस, मंगळवेढा | ११ |
| | १३ | सांगली | मिरज, आटपाडी, जत, कवठेमहाकाळ,शिराळा,वाळवा, खानापूर, विटा, तासगाव, कडेगाव, पलुस | ११ |
| | १४ | सातारा | सातारा, खटाव, माण, फलटण, खंडाळा, महाबळेश्वर,पाटण, जावळी, वाई, कोरेगाव, कराड | ११ |
| | १५ | कोल्हापूर | पन्हाळा, राधानगरी, गगनबावडा, भुदरगड, आजरा, चंदगड, शाहुवाडी, शिरोळ | ८ |
| छ. संभाजीनगर | १६ | छ. संभाजीनगर | छ. संभाजीनगर, कन्नड, सोयगाव, पैठण, वैजापूर, गंगापूर, खुलताबाद, सिल्लोड, फुलंब्री | ९ |
| | १७ | जालना | बदनापूर, घनसावंगी, अंबड, जालना, परतूर, मंठा, भोकरदन, जाफ्राबाद | ८ |
| | १८ | बीड | बीड, गेवराई, माजलगाव, केज, आंबेजोगाई, परळी, आष्टी, पाटोदा, शिरूर कासार, धारूर, वडवणी | ११ |
| | १९ | लातूर | लातूर, औसा, अहमदपूर, निलंगा, उदगीर, चाकूर, रेणापूर, शिरुरअनंतपाळ, देवणी, जळकोट | १० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | २० | धाराशिव | धाराशिव, कळंब, भूम, वाशी, तुळजापूर, लोहारा, परांडा, उमरगा | ८ |
| | २१ | नांदेड | नांदेड, बिलोली, कंधार, लोहा, हदगाव, भोकर, देगलुर, किनवट, हिमायतनगर, माहुर, धर्माबाद, उमरी, अर्धापुर, नायगाव,मुदखेडा, मुखेड | १६ |
| | २२ | परभणी | पूर्णा, पालम, परभणी, सोनपेठ, जिंतूर, गंगाखेड, सेलू, मानवत, पाथरी | ९ |
| | २३ | हिंगोली | हिंगोली, औंढा नागनाथ, कळमनुरी, सेनगाव, वसमत | ५ |
| अमरावती | २४ | बुलढाणा | जळगावजामोद, संग्रामपुर, चिखली, देऊळगावराजा, मेहकर, बुलडाणा, शिंदेखेडराजा, लोणार, खामगाव, शेगाव, मलकापुर, मोताळा, नांदुरा | १३ |
| | २५ | अमरावती | अमरावती, भातुकली, चांदूर रेल्वे, नांदगाव खंडेश्वर, धामणगाव रेल्वे, अचलपूर, अंजनगावसुर्जी, तिवसा, धारणी, चिखलदरा, वरुड, मोर्शी, चांदुरबाजार, दर्यापुर | १४ |
| | २६ | अकोला | अकोट, अकोला, पातूर, तेल्हारा, मुर्तीजापूर, बाळापूर, बार्शीटाकळी | ७ |
| | २७ | वाशिम | वाशीम, रिसोड, मालेगाव, मंगळूरपीर, कारंजा, मानोरा | ६ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | २८ | यवतमाळ | यवतमाळ, बाभुळगाव, कळंब, दारव्हा, दिग्रस, आर्णी, नेर, पुसद, उमरखेड, महागाव, वणी, मारेगाव, झरी जामणी, केळापुर, घाटंजी, राळेगाव | १६ |
| नागपूर | २९ | वर्धा | वर्धा, सेलू, देवळी, आर्वी, समुद्रपूर, हिंगणघाट, आष्टी,कारंजा | ८ |
| | ३० | नागपूर | नागपूर, कामठी, सावनेर, पारशिवनी, मौदा, भिवापूर, कळमेश्वर, काटोल, रामटेक, हिंगणा, उमरेड, कुही, नरखेड, नागपूर शहर | १४ |
| | ३१ | भंडारा | भंडारा, पवनी, लाखंदूर,मोहाडी व तुमसर | ५ |
| | ३२ | गोंदिया | तिरोडा,आमगांव,देवरी,सालेकसा व गोंदिया, अर्जुनी मोरगाव, सडक अर्जुनी, गोरेगाव | ८ |
| | ३३ | चंद्रपूर | चंद्रपूर, भद्रावती, गोंडपिंपरी, राजूरा, कोरपना, मूल, वरोरा, सावली, चिमूर, नागभिड, सिंदेवाही, पोंभुर्णा ,जिवती, ब्रम्हपूरी, व बल्लारपूर | १५ |
| | ३४ | गडचिरोली | गडचिरोली, चार्मोर्शी | २ |
| | | एकूण तालुके | | ३०५ |

Digitally signed by SUNIL SAHADEV SAMANT
Date: 2026.10.14 12:57:34 +05'30'

(सुनिल स. सामंत)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र शासन
उच्च शिक्षण संचालनालय,.महाराष्ट्र राज्य,
४१२ ई,बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर पुणे-४११०१६
Web : www.dhepune.gov.in E-mail:vishi.dhepune@nic.in
फोननं. ०२०/२६१२२१११

जा.क्र.: उशिसं/शिष्यवृत्ती/दुष्काळ –फीमाफी २६-२७/ई - ३१५४७३६ दि. /१०/२०२६.

प्रति,

मा. कुलसचिव,
सर्व राज्य सार्वजनिक विद्यापीठे,
महाराष्ट्र राज्य.

विषय- राज्यातील दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी विद्यापीठ स्तरावर'कृती समिती'(TaskForce) स्थापन करणेबाबत. . .

संदर्भ-
१. मंत्री महोदय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे अध्यक्षतेखाली आयोजित दि.१ ऑक्टोबर, २०२६ रोजी सर्व विद्यापीठांच्या मा.कुलगुरू यांचे समवेत झालेली बैठक.
२. शासन निर्णय मदत व पुनर्वसन विभाग क्रमांक समिती-२०२६/प्र.क्र.८२/मदत-२ दि. २५ सप्टेंबर, २०२६.
३. शासन पत्र क्रमांक ई-१८७०५८४/२७०१०(१०)२६१/२०२६-MHT-(HE-२), दि. ३० सप्टेंबर, २०२६.

उपरोक्त विषयाबाबत संदर्भिय बैठक तसेच शासन निर्णय व पत्राच्याअनुषंगानेकळविण्यातयेतेकी, राज्यात यंदा 'एल निनो'च्या प्रभावामुळे कमी पाऊस पडल्याने राज्यातील 34 जिल्ह्यांमधील 265 तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थिती घोषित करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर, दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणात कोणताही आर्थिक अडथळा येऊ नये आणि त्यांना दिलासा मिळावा यासाठी उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत विविध उपाययोजना राबवण्यात येत आहेत.

या अनुषंगाने, माननीय मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण श्री. चंद्रकांत दादा पाटील यांनी राज्यातील सर्वसार्वजनिक विद्यापीठांचे कुलगुरू, प्र-कुलगुरू, कुलसचिव व महाविद्यालयांचे प्राचार्य यांच्यासमवेत ऑनलाईन आढावा बैठक घेतली..

सदर आढावा बैठकीत माननीय मंत्री महोदयांनी दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी व अडीअडचणींचे निवारण करण्यासाठी प्रत्येक विद्यापीठ स्तरावर एक 'कृती समिती' (TaskForce) स्थापन करण्यात यावी असे निर्देश दिलेले आहेत. तसेच सदर कृती समितीने या संदर्भात विद्यापीठे व महाविद्यालये यांनी एकत्रितपणे पुढाकार

घेऊन दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांसाठी आवश्यक ती मदत तसेच उपाय योजना करण्याबाबतची उचित कार्यवाही तात्काळ करावी. तसेच त्या बाबतचा अहवाल संचानालयास दर महिन्याच्या १ व १६ तारखेस सादर करावा असे निर्देश दिलेले आहेत.

विद्यापीठस्तरावर गठीत करण्यात आलेल्या कृती समितीचा तपशील खालील तक्त्यात नमुद करून सादर करावा आणि विद्यापीठातर्फे राबविण्यात येणा-या मदत व उपाययोजनांचा तपशीलात्मक अहवाल या संचालनालयास तात्काळ सादर करावा. तसेच पुढील अहवाल दर १५ दिवसानी न चूकता सादर करण्यात यावा.

कृती समितीची माहिती

| अ.क्र. | सदस्याचे नाव | पदनाम | मोबाईल क्रमांक | ई-मेल | कृतीसमितीतीलपदनाम |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | कृतीसमितीअध्यक्ष |
| | | | | | सदस्य |
| | | | | | सदस्य |
| | | | | | समन्वयक / संपर्क अधिकारी |

सदर कृती समितीमार्फत दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांच्या अर्जाची छानना, परीक्षा शुल्क माफी/प्रतिपूर्तीची प्रक्रिया आणि महाविद्यालयांशी समन्वय साधण्याचे काम युद्धपातळीवर पूर्ण करण्यात यावे.

Digitally signed by
SHAILENDRA KAMLAKAR DEOLANKAR
Date: 07-10-2025 12:46:23

(डॉ. शैलेंद्र देवळाणकर)
शिक्षणसंचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे १६.

प्रत —माहितीस्तव सादर

1. मा. मंत्री महोदयांचे खासगी सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
2. मा. अपरमुख्यसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रत-माहिती व कार्यवाहीसाठी

सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.

सन २०२६ च्या खरीप हंगामातील Trigger-१ (प्रथम कळ) लागू झालेल्या २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करुन विविध उपाययोजना व सवलती लागू करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
मदत व पुनर्वसन विभाग,
शासन निर्णय क्रमांक:- समिती-२०२६/प्र.क्र.८२/मदत-२
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई- ४०००३२
दिनांक:- २५ सप्टेंबर, २०२६

वाचा:- १) शासन निर्णय क्रमांक: संकिर्ण-२०१७/प्र.क्र.१७३/२०१७/३ दि.०७ ऑक्टोबर, २०१०
२) शासन निर्णय, क्रमांकः संकिर्ण-२०१७/प्र.क्र.१७३/२०१७/म-७, दि. २८ जून, २०१८
३) शासन पत्र क्रमांकः एससी वाय-२०२१/प्र.क्र.१००/म-७, दि. १८ ऑक्टोबर, २०२१
४) शासन निर्णय क्रमांक: एससीवाय-२०२३/प्र.क्र.३७/म-७, दि. ३१ ऑक्टोबर, २०२३
५) कृषी आयुक्त यांचा अहवाल दि. २४ सप्टेंबर २०२६

**प्रस्तावना:**

दुष्काळ व्यवस्थापन संहिता २०१६ नुसार राज्यातील दुष्काळी परिस्थितीचे मूल्यांकन करण्याबाबत संदर्भाधीन शासन निर्णय क्रमांक १ व २ अन्वये सविस्तर कार्यपध्दती विहित करण्यात आली आहे. खरीप २०२६ च्या हंगामातील परिस्थितीच्या आधारे राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थिती असल्याचे Trigger-१ (प्रथम कळ) संदर्भात आयुक्त कृषी यांच्या अहवाला वरुन दिसून येते. सदरहू Trigger-१ (प्रथम कळ) नुसार दुष्काळी तालुके घोषित करणे व त्यामध्ये करावयाच्या विविध उपाययोजना व सवलती लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

राज्यातील तालुक्यांमध्ये जून ते आज पर्यत या कालावधीतील पर्जन्याची तूट व अन्य घटकांनी प्रभावित झालेल्या २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थिती असल्याचे आयुक्त, कृषी यांच्या अहवालावरून दिसून येते. सदर २६५ तालुक्यांमध्ये Trigger-१ (प्रथम कळ) लागू असल्यामुळे तिथे पंचनामे करण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी यांनी तात्काळ सुरु करावी. सर्व्हेक्षण केलेल्या क्षेत्रातील पिकांची स्थिती दर्शवणारे छायाचित्र व जीपीएस कोऑडीनेट संकलन करून पिक परिस्थितीचा अहवाल आयुक्त,कृषी यांच्या मार्फत शासनास तात्काळ सादर करण्यात यावा.

२. राज्यातील दुष्काळग्रस्त Trigger-१ (पहिली कळ) २६५ तालुक्यांत लागू असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे परिशिष्ट-१ मध्ये नमूद एकूण २६५ तालुक्यांतील दुष्काळग्रस्त भागासाठी राज्य शासनाकडून विशेष बाब म्हणून खालील उपाययोजना व सवलती लागू करण्याचा निर्णय घेतला आहे.

१) जमीन महसूलात सूट

२) पिक कर्जाचे पुनर्गठन

३) शेतीशी निगडीत कर्जाच्या वसूलीस स्थगिती

४) कृषी पंपाच्या चालू विजबिलात सूट *(७.५ हॉर्सपावर पर्यंत क्षमतेच्या विजपंपाचे वीज बिल अगोदरच माफ करण्यात आले आहे. त्यावरील वीज पंपांना सदर सूट लागू असेल)*

५) शालेय/महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परिक्षा शुल्कात माफी

६) रोहयो अंतर्गत कामाच्या निकषात शिथिलता आणून जास्तीत जास्त कामे सुरु करणे

७) आवश्यक तेथे पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी टँकर्सचा वापर

८) टंचाई जाहीर केलेल्या गावात शेतक-यांच्या शेतीच्या पंपाची वीज जोडणी खंडीत न करणे

९) शेतीवर आश्रित शेतकरी/मजूर इत्यादी यांना अन्न धान्याची टंचाई होणार नाही याबाबत व्यवस्था उभी करणे

१०) जनावरांना आवश्यक चारा उपलब्ध होईल याची व्यवस्था करणे

११) जलसंधारणाची कामे सुरु करणे

१२) अगोदरच निर्गमित करण्यात आलेले शासन निर्देशाप्रमाणे पिण्याचे पाणी आणि जनावरांसाठी पाण्याचे नियोजन करणे

३. सदर २६५ तालुक्यांमधील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना शेत पिकांच्या नुकसानीबाबतची मदत विहीत कार्यपध्दतीची पूर्तता करुन स्वतंत्र शासन निर्णयान्वये जाहीर केली जाईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०९२६१११७४९४९४१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by SANJAY SHANKARRAO INGLE
Date: 2026.09.26 11:21:13 +05'30'

(संजय इंगळे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, मलबार हिल. मुंबई

२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई

३) मा. उपमुख्यमंत्री (गृह) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मा. उपमुख्यमंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५) सर्व मा. लोकसभा सदस्य/राज्यसभा सदस्य (महाराष्ट्रातील)
६) सर्व मा. विधानसभा सदस्य/विधान परिषद सदस्य
७) सर्व मा. मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
८) मा. मुख्य सचिव यांचे सहसचिव, मंत्रालय, मुबई
९) अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१०) अपर मुख्य सचिव (कृषी), कृषी, मंत्रालय, मुंबई
११) अप्पर मुख्य सचिव (महसुल), महसुल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१२) अपर मुख्य सचिव (सहकार), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुबई
१३) अपर मुख्य सचिव (जलसंपदा), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
१४) प्रधान सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
१५) प्रधान सचिव (पाणी पुरवठा व स्वच्छता), पाणी पुरवठा विभाग, जी. टी हॉस्पीटल, मुंबई
१६) प्रधान सचिव (मृदु व जलसंधारण), मृदु व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुबई
१७) प्रधान सचिव (उच्च व तंत्र शिक्षण), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
१८) प्रधान सचिव (ऊर्जा), , ऊर्जा विभाग, मंत्रालय, मुंबई
१९) आयुक्त (कृषि), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
२०) महालेखापाल १/२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
२१) महालेखापाल १/२ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
२२) सर्व विभागीय आयुक्त
२३) सर्व जिल्हाधिकारी
२४) सर्व जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी
२५) वित्त विभाग (व्यय-९/ अर्थसंकल्प/अर्थोपाय), मंत्रालय, मुंबई.
२६) सर्व सहसचिव/उपसचिव, कृषी विभाग, मंत्रालय, मुंबई
२७) सह सचिव तथा वित्तिय सल्लागार, मदत व पुनर्वसन, नवीन प्रशासन इमारत, मंत्रालय, म
२८) महसूल व वन विभाग, कार्यासन क्रमांक मदत-१/मदत-३
२९) निवडनस्ती (कार्यासन मदत-२)

शासन निर्णय, क्रमांक:- समिती-2026/प्र.क्र.82/मदत-2

परिशिष्ट-1

खरीप हंगाम-2026 -प्रथम कळ (Trigger-1) लागु झालेल्या तालुक्यांची माहीती

| महसूल विभाग | अ.क्र. | जिल्हा | प्रथन कळ (Trigger-1) लागू झालेले तालुके | |
|---|---|---|---|---|
| | | | तालुक्यांची नावे | तालुक्यांची संख्या |
| ठाणे | 1 | ठाणे | निरंक | 0 |
| | 2 | पालघर | निरंक | 0 |
| | 3 | रायगड | श्रीवर्धन | 1 |
| | 4 | रत्नागिरी | रत्नागिरी,संगमेश्वर, राजापूर | 3 |
| | 5 | सिंधुदुर्ग | सावंतवाडी, दोडामार्ग, कणकवली , कुडाळ, वैभववाडी, मालवण, देवगड, वेंगुर्ला | 8 |
| नाशिक | 6 | नाशिक | मालेगाव, बागलाण, कळवण, नांदगाव, सुरगणा, इगतपुरी, पेठ, सिन्नर, येवला, देवळा | 10 |
| | 7 | धुळे | धुळे, साक्री, सिंदखेडा, शिरपूर | 4 |
| | 8 | जळगांव | एरंडोल , पारोळा, धरणगाव ,चोपडा ,पाचोरा , जामनेर, जळगाव ,भडगाव , अमळनेर ,रावेर, चाळीसगाव,भुसावळ, बोदवड, मुक्ताईनगर , यावल, | 15 |
| | 9 | नंदुरबार | अक्कलकुवा, शहादा, नंदूरबार, नवापुर, तळोदा, अक्राणी | 6 |
| | 10 | अहिल्यानगर | नगर, पारनेर, श्रीगोंदा, कर्जत, जामखेड, शेवगाव, पाथर्डी, नेवासा, राहुरी, संगमनेर, अकोले, कोपरगाव, श्रीरामपुर, रहाता | 14 |
| पुणे | 11 | पुणे | भोर, वेल्हा, खेड , शिरूर , बारामती, इंदापूर , दौंड,पुरंदर, | 8 |
| | 12 | सोलापूर | उ. सोलापूर, द. सोलापूर , बार्शी, अक्कलकोट, मोहोळ, माढा, करमाळा पंढरपूर, सांगोला, माळशिरस, मंगळवेढा, | 11 |
| | 13 | सांगली | मिरज, आटपाडी, जत, कवठेमहाकाळ, | 4 |
| | 14 | सातारा | सातारा,खटाव, माण, फलटण, खंडाळा महाबळेश्वर | 6 |

शासन निर्णय, क्रमांक:- समिती-2026/प्र.क्र.82/मदत-2

परिशिष्ट-1

खरीप हंगाम-2026 -प्रथम कळ (Trigger-1) लागु झालेल्या तालुक्यांची माहीती

| महसूल विभाग | अ.क्र. | जिल्हा | प्रथम कळ (Trigger-1) लागू झालेले तालुके | |
|---|---|---|---|---|
| | | | तालुक्यांची नावे | तालुक्यांची संख्या |
| | 15 | कोल्हापूर | पन्हाळा, राधानगरी, गगनबावडा, भुदरगड,आजरा, चंदगड, | 6 |
| छ. संभाजीनगर | 16 | छ. संभाजीनगर | छ. संभाजीनगर, कन्नड, सोयगाव, पैठण, वैजापूर,गंगापूर खुलताबाद, सिल्लोड,फुलंब्री | 9 |
| | 17 | जालना | बदनापूर ,घनसावंगी अंबड , जालना परतूर,मंठा , भोकरदन, जाफ्राबाद | 8 |
| | 18 | बीड | बीड ,गेवराई, माजलगाव, केज, आंबेजोगाई, परळी, आष्टी, पाटोदा, शिरूर कासार, धारूर, वडवणी, | 11 |
| | 19 | लातूर | लातूर, औसा, अहमदपूर, निलंगा, उदगीर, चाकूर, रेणापूर, शिरुरअनंतपाळ, देवणी, जळकोट | 10 |
| | 20 | धाराशिव | धाराशिव, कळंब, भूम, वाशी, तुळजापूर,लोहारा,परांडा ,उमरगा | 8 |
| | 21 | नांदेड | नांदेड, बिलोली, कंधार, लोहा, हदगाव, भोकर, देगलुर, किनवट, हिमायतनगर, माहुर, धर्माबाद, उमरी, अर्धापुर, नायगाव | 14 |
| | 22 | परभणी | पूर्णा, पालम, परभणी, सोनपेठ जिंतूर, गंगाखेड, सेलू, मानवत, पाथरी | 9 |
| | 23 | हिंगोली | हिंगोली, औंढा नागनाथ, कळमनुरी, सेनगाव , वसमत | 5 |
| अमरावती | 24 | बुलढाणा | जळगावजामोद, संग्रामपुर, चिखली, देऊळगावराजा, मेहकर, बुलडाणा, शिंदेखेडराजा, लोणार, खामगाव, शेगाव, मलकापुर, मोताळा, नांदुरा | 13 |
| | 25 | अमरावती | अमरावती, भातुकली, चांदूर रेल्वे, नांदगाव खं., धामणगाव रेल्वे, अचलपूर, अंजनगावसुर्जी, तिवसा, धारणी, चिखलदरा, वरुड, मोर्शी, चांदुरबाजार, दर्यापुर | 14 |
| | 26 | अकोला | अकोट, अकोला, पातूर, तेल्हारा, मुर्तीजापूर, बाळापूर बार्शीटाकळी | 7 |

शासन निर्णय, क्रमांक:- समिती-2026/प्र.क्र.82/मदत-2

परिशिष्ट-1

खरीप हंगाम-2026 -प्रथम कळ (Trigger-1) लागु झालेल्या तालुक्यांची माहीती

| महसूल विभाग | अ.क्र. | जिल्हा | प्रथम कळ (Trigger-1) लागू झालेले तालुके | |
|---|---|---|---|---|
| | | | तालुक्यांची नावे | तालुक्यांची संख्या |
| | 27 | वाशिम | वाशीम, रिसोड, मालेगाव, मंगळूरपीर ,कारंजा ,मानोरा | 6 |
| | 28 | यवतमाळ | यवतमाळ, बाभुळगाव, कळंब, दारव्हा, दिग्रस, आर्णी, नेर, पुसद, उमरखेड, महागाव,वणी, मारेगाव, झरी -जामणी, केळापुर, घाटंजी, राळेगाव | 16 |
| | 29 | वर्धा | वर्धा, सेलू, देवळी, आर्वी, समुद्रपूर, हिंगणघाट, आष्टी | 7 |
| | 30 | नागपूर | नागपूर, कामठी, सावनेर, पारशिवनी, मौदा, भिवापूर, कळमेश्वर, काटोल, रामटेक, हिंगणा,उमरेड, कुही, नरखेड, नागपूर शहर | 14 |
| नागपुर | 31 | भंडारा | भंडारा, पवनी, लाखंदूर | 3 |
| | 32 | गोंदिया | तिरोडा | 1 |
| | 33 | चंद्रपूर | चंद्रपूर, भद्रावती, गोंडपिंपरी , राजूरा कोरपना, मूल, वरोरा, सावली, चिमूर, नागभिड, सिंदेवाही, पोंभुर्णा | 12 |
| | 34 | गडचिरोली | गडचिरोली, चामोर्शी | 2 |
| | एकूण तालुके | | | 265 |

Digitally signed by SANJAY SHANKARRAO INGLE
Date: 2026.09.26 11:21:30 +05'30'

(संजय इंगळे)

सह सचिव, महाराष्ट्र शासन